
म. ग्र. स. ठाणे
चारोगा
९२६८८
१९६५
REFBK-0014453

# कै. गोविंदराव याळगी

## यांचें चरित्र





पुंडलीकजी

कै. दे. भ. गोविंद व्यंकटेश याळगी यांचें चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
........ नों. दि: ........

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र.

૪૦૦૮૮
ચારિત્ર
૨૮.૧૧.૯૨
રૂ.૬।।.
જહેરાત
ઉદ્દેશ
૧૨-૮૦



कै. दे. भ. गोविंद व्यंकटेश याळगी

# कै. दे. भ. गोविंद व्यंकटेश याळगी यांचें चरित्र

लेखक

श्री. पुंडलीकजी कातगडे, बेळगांव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ७००८ वि: चरित्र
क्रमांक १२... नों दि ...

प्रस्तावनालेखक

सेनापति श्री. पांडुरंग महादेव बापट

REFBK-0014453
REFBK-0014453

शके १८८६] [सन १९६५

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक
रामचंद्र व्यंकटेश वडवी
पो. हुदली, जि. बेळगांव

किंमत १० रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११४५३

# लेखकाची मनोभावना

चांगलें किंवा सुमार कसें का होईना, कै. दे. भ. गोविंदराव याळगी यांचें चरित्र मी लिहूं शकलों यांतच माझ्या मनाला समाधान आहे. माझ्यापेक्षां अधिक चांगला, खंदा, व भावनाप्रधान लेखक या चरित्राला लाभावयास पाहिजे होता. एखादा 'महादेवभाई देसाई' या चरित्रग्रंथाला लेखक म्हणून लाभला असता, तर त्यानें अनेक अमोल गुणसंभाराच्या या मूक चित्रपटाचा उत्तम, प्रभावी बोलपट करून दाखविला असता.

गोविंदरावांची उभी हयात किंवा जीवन धकाधकीच्या मामल्यांत गेलें! त्यांनीं आपल्या जीवनांत जे विचार आपल्या उराशीं बाळगून ठेवले होते, ज्या भावनांची जपणूक केली होती, आपला जीव इतरांच्या सुखासाठीं वा देशकार्यासाठीं धोक्यांत घालण्याची जी हौस शेवटपर्यंत टिकवून धरली होती, प्रसिद्धिपराङ्मुखतेची जी साधना केली होती, जीं धोरणें सांभाळलीं होतीं, धन व मान यांपासून दूर रहण्याची जी तपश्चर्या केली होती, या सर्व व इतर अमोलिक व दुर्मिळ प्रवृत्तींच्या पार्श्वभूमीस असलेलें त्यांचें आंतरमन उकलून दाखविण्यास पानेंच्या पानें लिहीत बसावें लागेल, महाभारत लिहावें लागेल. असला सच्चा, हाडाचा देशभक्त बंधु म्हणून, स्नेही म्हणून, अथवा शिष्य म्हणून लाभण्यास त्या बंधूचे, त्या स्नेह्याचें आणि त्या गुरुजींचें अहोभाग्य किंवा पूर्वपुण्याईच असावी लागते. असल्या गुरु-शिष्यांची सेवा करण्याची संधि मिळण्यासहि तसेंच कांहीं पूर्वपुण्याईचें संचित गांठीशीं असावें लागतें. हीच भावना, कै. दे. भ. गोविंदरावांच्या विषयीं, गंगाधरराव देशपांडे यांनीं आपल्या 'माझी जीवनकथा' आत्मचरित्रांत नमूद करून ठेविलेली आहे. थोरांचें थोरपण आकलन होण्यासहि आपल्या स्वतःचें मन-बुद्धि-अंतःकरण थोर असावें लागतें, असें जें म्हणतात तें अगदीं यथार्थ आहे. अशांच्या जीवनांचें शब्दचित्र मीं कितीहि शाई व रंग खर्चीं घातला तरी तें तोकडेंच ठरणार आहे. गोविंदरावांविषयीं गंगाधररावांना किती आत्मीयता वाटत होती याचें प्रत्यंतर गोविंदरावांच्या अकालीं निधनानिमित्त भरलेल्या जाहीर शोकसभेंत सर्व लोकांना आलें. गंगाधररावांना त्या प्रसंगीं बोलतांच येईना, म्हणून ते एकदां गादीवरून खालींच बसले. पण पुन्हा शोक आवरून धैर्य करून ते बोलावयास उभे राहिले आणि पहिलेंच वाक्य त्यांनीं

उच्चारलें कीं, 'गोविंदराव नसते तर माझें आज बेरावें श्राद्ध झालें असतें.' एवढेंच वाक्य उच्चारून ते पुन्हा खालीं बसले. आणि त्यांनेतर लागलीच उठून केलेल्या भाषणांत ते म्हणाले होते कीं, प्रतिपक्षाचे बाण आपल्या शरसंधानानें ते मधल्यामध्येंच तोडून टाकीत असत. राजकारणांत असें शरसंधान अगदीं अचूक असावें लागतें. ही त्यांना ईश्वरी देणगीच होती !

गोविंदरावांची स्वातंत्र्यनिष्ठा एवढी जबरदस्त होती कीं, कांहींहि करून आपल्या देशाची ही गुलामगिरी नष्ट झालीच पाहिजे अशी तीव्र संभूति त्यांना वाटत होती. निधनापूर्वी आपल्या बंधूंना गोविंदरावांनीं सांगून ठेविलें कीं, 'गंगाधरराव ज्या कोणत्या स्वातंत्र्याच्या चळवळी करतील त्यांत आपल्या हातून होईल तितकी आर्थिक झीज सोशीत जा, मदत करीत जा.' असा प्रयत्न करणारी देशामध्यें जी शक्ति असेल त्याला आपण तन-मन-धनानें मदत करावी व त्या घडघडींत आवश्यकच झाल्यास आपलें सर्वस्व व वेळीं प्रसंगीं आपलें जीवितहि खर्ची घालावें अशी उत्कट इच्छा गोविंदरावांना होती. आपल्या देशाला स्वातंत्र्य, स्वराज्य, केव्हां मिळेल, कसें मिळेल, कोणाच्या हातीं तें जाईल याची कल्पनाहि करतां येण्यासारखें ज्या वेळीं नव्हतें, अशा काळीं आपल्या ध्येयाच्या मृगजळाच्या मागें एका अर्थी धावत धापा टाकण्यांतच त्यांना सुख व समाधान होतें. अक्षरशः अनामिक राहून, ज्वलंत निष्ठेनें आपलें जीवित व सर्वस्वहि सतत धोक्यांत घालून काम करीत राहण्याची वृत्ति, त्या काळीं गोविंदरावांच्यासारख्या कित्येक कार्यकर्त्यांमध्यें होती. आणि त्या काळच्या समाजनेत्यांची तीच खरी शक्ति होती. आजच्या समाजांत तीच गोष्ट अत्यंत दुर्मिळ होऊन बसलेली आहे, एवढेंच नव्हे, ती आपल्यांतून अगदीं नष्टच झालेली आहे. आपल्या त्यागाचें मोजमाप त्या काळचे कार्यकर्ते व पुढारी करीत नसत, तर हातीं घेतलेल्या कार्याला किती त्यागाची आवश्यकता आहे याचें मोजमाप घालीत असत. आपल्या त्यागाचा मोबदला त्या काळची पिढी कधींच इच्छीत नव्हती, आणि याच्या उलट आज मोबदल्यावांचून कोणी कांहीं करूं जाईल तर त्याला मूर्खांत काढण्यांत येतें. राष्ट्रसंवर्धनास अत्यंत आवश्यक असलेली भावना पुनः आपल्या समाजांत दाखल होण्यास गोविंदरावांच्या चरित्राचा उपयोग होईल किंवा व्हावा असें मला वाटतें. या चरित्राच्या नायकाविषयीं माझी हीच मनोभावना आहे.

लोकशाहीच्या मार्गानें भारतासारख्या सनातन समाजाचें संपूर्ण परिवर्तन घडवून आणण्याचें कंकण आपण आपल्या हातीं बांधलेलें आहे. गोविंदरावांच्या ध्येयाचीं, गोविंदरावांच्या चारित्र्याचीं व उत्कृष्ट भावनेचीं माणसें आपल्या समाजाच्या सर्व थरांत मोठ्या संख्येनें निर्माण झाल्याशिवाय ही सामाजिक क्रांति घडून येणें अशक्य आहे. आणि म्हणूनच कोणत्याहि थोर राष्ट्रीय नेत्यापेक्षां या सर्वसाधारण गृहस्थ सेवकाची कथा उद्बोधक व मार्गदर्शक होईल, या भावनेनेंच या आमच्या शूर लढवय्या निष्ठावंताचें चरित्र मी सादर करीत आहें.

## लेखकाची मनोभावना

एखादा सामाजिक व राजकीय गंभीर दोष स्पष्ट दिसून आला, आणि त्यापासून होणारें सामाजिक व राष्ट्रीय नुकसान अथवा हानि सर्वांनीं बौद्धिक पातळीवर मान्य केली, तरीहि तो दोष दूर करण्याचा इलाज वा उपाय लोकमानसाला किंवा आपल्या नेत्यांना सुचूं नये, ही एक कींव अथवा दया येण्यासारखी स्थिति आहे, असेंच गोविंदरावांना वाटत होतें; आणि तसाच एखादा उपाय किंवा इलाज सुदैवानें सुचला तरी, आपल्या समाजाला तो पेलतां येऊं नये, झेपूं नये, ही लाजिरवाणी गोष्ट आहे अशीच त्यांची भावना होती. आणि म्हणून आपण हातीं घेतलेल्या समाजकारणाच्या किंवा राजकारणाच्या कोणत्याहि आंदोलनावर एखाद्या सिंहाप्रमाणें ते आपल्या साथी अथवा सहकाऱ्यांसह झडप घालीत असत, तुटून पडत असत. हाच त्यांच्या मनांतील क्रांतिवृत्तीचा निर्मळ झरा होता. केवळ त्यांच्यापुरतेंच नव्हे, खरोखर खोल विचार केल्यास, 'क्रांतिवृत्तीचा हाच खरा झरा असतो, नव्हे असावयास पाहिजे' असें दिसून येईल. त्यांच्या संबंधांत आलेला कोणताहि कार्यकर्ता किंवा सहकारी शेवटपर्यंत टिकला, त्यांनीं कोणालाहि आपला शत्रु होऊं दिलें नाहीं, याचें खरें रहस्य या क्रांतिनिर्झरांतच आहे.

इंग्रजी भाषेंत असें म्हणतात कीं, Truth is stranger than fiction, सत्य हें कल्पितापेक्षां अधिक अद्भुत असतें. गोविंदरावांचें प्रस्तुत चरित्र वाचून कोणासहि या म्हणीचें स्मरण होण्यासारख्या घटना त्यांत घडून आलेल्या आहेत. म्हणून मला येथें आवर्जून सांगावयाचें आहे कीं, यांतील प्रत्येक घटना गोविंदरावांच्या नातलग व हयात परिचितांकडून तावूनसुलाखून व पारखूनताडून मीं घेतलेली आहे.

## आभार

या चरित्रग्रंथाची माझी हस्तलिखित प्रत पाहून, त्यांत अनेक सुधारणा सुचवून, याळगी घराण्यांतील सर्वच आबालवृद्ध स्त्री-पुरुषांनीं, विशेषतः गोविंदरावांचे बंधुद्वय श्री. कृष्णराव आणि श्री. जीवनराव आणि गोविंदरावांचे चिरंजीव डॉ. अनंतराव यांनीं मला मनःपूर्वक मदत केलेली आहे. गोविंदरावांचे अनेक सहकारी व परिचित, विशेषतः श्री. हणमंतराव देशपांडे यांचीहि मदत मला या कामीं झालेली आहे. या चरित्रग्रंथाची सुवाच्य प्रत-प्रेस-कॉपी-वेळेवर लिहून काढण्याचें काम माझे स्नेही श्री. कृष्णाजी बाबूराव मराठे यांनीं केलेलें आहे. या ग्रंथावरील जॅकेट अर्थात् मलपृष्ठ तयार करून देण्याचें काम माझे एक स्नेही श्री. दत्तकुमार पै यांनीं केलें आहे; पू. सेनापति श्री. पांडुरंग महादेव बापट तथा तात्यासाहेब यांनीं समग्र ग्रंथ काळजीपूर्वक वाचून व आपल्या एका समानधर्मीचें हें चरित्र आहे हें ध्यानांत घेऊन, सुंदर व जिव्हाळ्याची प्रस्तावना लिहून गोविंदरावांचा गौरव केला आणि या ग्रंथाला आशीर्वाद दिला आहे. श्री. श्रीपाद शंकर नवरे व श्री. बाळकृष्ण रंगराव सुंठणकर या मित्रद्वयांना 'वाट पुसत' मी या

दे. भ. गोविंद व्यंकटेश याळगी

चरित्रग्रंथाचें लिखाण केलें आहे; आणि 'मौज प्रिंटिंग ब्यूरो'चे मालक श्री. भागवत यांनीं केवळ बारा दिवसांच्या अवधींत या ग्रंथाची उत्तम छपाई वगैरे करून दिलेली आहे. या सर्वांच्या मदतीवांचून हा ग्रंथ इतक्या लवकर प्रकाशित होऊंच शकला नसता व त्यांत अपूर्णता राहिली असती; म्हणून या सर्वांचा मी अत्यंत आभारी व ऋणी आहें.

दासनवमी
ता. २४ फेब्रुवारी १९६५

पुंडलीकजी कातगडे

## हार्दिक आभार

"कै. दे. भ. गोविंदराव याळगी यांचें चरित्र"
या ग्रंथाचें यथार्थ मूल्यमापन करून
'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळा'ने
**तो ग्रंथ पुरस्कृत केला**
याबद्दल मंडळाचा
**मी**
अत्यंत आभारी व ऋणी आहें.

पुंडलीकजी कातगडे

ॐ

# 'नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं'

बेळगांवचे कै. दे. भ. गोविंदराव याळगी यांच्या या चरित्राला प्रस्तावना लिहिण्याची विनंति मला कां करण्यांत आली तें मला समजत नाहीं. कारण पुस्तकांना प्रस्तावना किंवा उपोद्घात लिहिण्याचा मला सराव नाहीं. मी लेखक नाहीं, आणि साहित्यिक तर नाहींच नाहीं. माझ्या आयुष्यांत मीं प्रसंगोपात्त थोडेंबहुत लिहिलें असेल–कांहीं स्वतःला वाटलें म्हणून, दुसऱ्यांनीं कांहीं लिहावयास सांगितलें म्हणून—पण लेखक व्हावें म्हणून नव्हे.

दुसरी अडचण म्हणजे वयोमानानें माझी स्मृति बरीच शिथिल झाली आहे. वाचलेलें सर्वच्या सर्व लक्षांत रहातेंच असें नाही; आणि दुसरें म्हणजे कै. गोविंदराव याळगी यांचा आणि माझा जवळून दीर्घ परिचय होण्याचा कधीं योगच आला नाहीं. त्यांचे व माझे उद्योग कांहीं काळपर्यंत एकाच दिशेनें चालले होते असें या त्यांच्या चरित्र–ग्रंथावरून दिसतें. या पुस्तकांत पृष्ठ ७८ वर माझा एक ओझरता उल्लेख आलेला आहे. तो असा कीं, "मॅझिनी क्लबा'नें 'बॉंब कसे तयार करावेत' या विषयावर सेनापति बापटांनीं एक पुस्तक लिहिलें होतें, त्याची प्रत मिळविली आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखालीं हालचालीला सुरुवात केली. सेनापति बापटांकडून ती विद्या शिकून घेण्यासाठीं बेळगांवहून १।२ तरुण त्यांच्याकडे पाठविण्यांत आले होते."

या वाक्यापैकीं पूर्वार्ध मला चांगला स्मरतो, उत्तरार्ध तितकासा स्मरत नाहीं. माझ्या त्या वेळच्या उद्योगांत पुष्कळच तरुण माझ्या सहवासांत आलेले होते; त्या मध्यें बेळगांवचेहि कांहीं असतील. कै. गोविंदरावांपेक्षां कै. गंगाधरराव देशपांडे यांचा व माझा संबंध अधिक आलेला. लोकमान्य टिळकांच्याकडे त्यांचें जाणें–येणें फार असे. मी टिळकांच्या अगदीं निकटवर्तियांपैकीं कधींच नव्हतों. तथापि त्यांच्या परिसरांत कधीं कधीं हिंडत होतो, आणि सुचेल त्याप्रमाणें माझे उद्योग मी स्वतंत्रपणें करीत होतों, इतकें मात्र खरें. माझे उद्योग टिळकांना किंवा त्यांच्या निकटवर्तियांना आवडतात कीं नाहीं याचा विचार

मी कधींच करीत नसे. हिंदुस्थानला मी परत आल्यानंतर एकदां लोकमान्यांना भेटलों, व म्हटलें कीं, "आतां मी आपली रजा घेतों आणि माझ्या 'उद्योगा'ला मी लागतों." तेव्हां ते म्हणाले कीं, "तसें करूं नका, मी लवकरच सिंहगडावर कांहीं दिवस राहावयास जाणार आहें. तेथें आपण मिळून कांहीं दिवस राहूं व बोलूं. नंतरच तुम्ही आपल्या 'उद्योगा'ला लागा." पण ईश्वरी योगायोग असा कीं, दुसऱ्या दिवशींच लोकमान्यांना अटक झाली.

गोविंदरावांच्याकडे गेलेल्या पुस्तकाविषयींची हकीकत अशी आहे. बेळगांवहून बॉंब करण्याची कला शिकण्यास माझ्याकडे कोणी आल्याचें मला स्मरत नाहीं. 'बापटांनीं एक पुस्तक लिहिलें होतें' या वाक्यानें भलतेंच श्रेय माझ्याकडे येतें. खरी हकीकत अशीः- एक हस्तलिखित पुस्तक आम्हांला (पॅरिसमध्यें हेमचंद्रदास, मिर्झा अब्बास, व मी असे तिघे जण, बॉंबविद्या शिकण्यासाठीं सन १९०७ सालीं राहिलों होतों.) एका रशियन वृद्धानें दिलें. त्या जुन्या रशियन हस्तलिखित कागदांचीं छायाचित्रें हेमचंद्रानें घेतलीं आणि मूळ कागद आम्हीं परत केले. माझी एक रशियन मैत्रीण होती, तिनें त्या रशियन हस्तलिखिताचें इंग्रजी भाषांतर करून दिलें. त्या भाषांतराच्या प्रती सायक्लोस्टाइलसारख्या विशिष्ट मसाल्याच्या कागदाच्या मदतीनें मीं केल्या. कांहीं प्रती हेमचंद्रास व मिर्झा अब्बास यांच्याजवळ देऊन त्यांना मीं भारतांत पाठविलें. त्या प्रतींच्या प्रती झाल्या व त्यांपैकीं एक प्रत बेळगांवांत 'मॅझिनी क्लबा'कडे गेलेली होती. त्याची एक प्रत माझ्याकडून होतीलाल वर्मा यानें 'टिळकांना पाहिजे आहे,' असें सांगून मागून नेली. मीं त्याला एक प्रत दिली होती. भारतांत परत आल्यानंतर 'होतीलाल वर्माकडून' 'अशा अशा पुस्तकाची एक प्रत आपल्याला मिळाली काय?' असें मीं टिळकांना भेटतांच पहिला प्रश्न विचारला होता आणि मला टिळकांनीं होकारार्थी उत्तर दिलें होतें.

गोविंदराव याळगी यांचे कांहीं 'उद्योग' माझ्या कानावर आलेले होते, पण या चरित्र-ग्रंथानें त्यांच्या सर्व खटाटोपांची चांगली कल्पना येते. गंगाधरराव देशपांडे यांना त्यांचा फारच मोठा आधार होता. त्यांच्या साहाय्यामुळें गंगाधररावांना बेळगांवांत आणि कर्नाटकांत कितीतरी राजकीय गोष्टी करतां आल्या आणि टिळकांच्या पुढारीपणाखालीं देशांत—विशेषतः महाराष्ट्रांत—चाललेल्या कितीतरी नवीन नवीन गोष्टी करतां आल्या. विशेष म्हणजे या चरित्र-ग्रंथाचे लेखक श्री. पुंडलीकजी यांना आपल्या सार्वजनिक आयुष्याच्या अगदीं सुरुवातीलाच गंगाधररावांच्या आणि गोविंदरावांच्या कुटुंबांतील एखाद्या माणसाप्रमाणें अगदीं घरोब्याचा संबंध आलेला होता. या दोघांचा विश्वास संपादन करून, दोघांनीं त्यांचेवर विश्वासानें वेळोवेळीं टाकलेली जबाबदारी त्यांनीं निष्ठेनें पार पाडलेली आहे. पुंडलीकजींना दोघांविषयीं सारखाच आदर होता. अगदीं गुलदस्तांतील गोष्टी त्यांना समजण्याची शक्यता होती. बहुतेक घटना लेखकाला ज्ञात आहेत. गंगाधरराव-गोविंदराव यांचे बहुतेक सहकारी आतां कालोदरांत गडप झालेले असले तरी,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ८७०८८ विः चरित्र
क्रमांक ९२६८० नोंदणी २८।१२।८४ 'नमस्तुभ्यं'

सुदैवानें कांहीं हयात आहेत. विशेषतः गोविंदरावांचे दोन धाकटे बंधु-कृष्णराव आणि जीवनराव-साक्षीभूत आहेत. त्यामुळें कांहीं घटनांच्या तपशिलांची सत्यता पटवून घेणें शक्य झालें. पुंडलिकजींनीं आपलें सगळें हस्तलिखित त्यांना वाचून दाखवून योग्य त्या दुरुस्त्या केल्या, हें बरें झालें. अशा सर्वच घटनांचा कागदोपत्रीं पुरावा ठेविणें त्या काळीं फार जोखमीचें होतें, आणि या घटनांचा पुढेंमागें तपशीलवार इतिहास लिहावा लागेल अशी त्या वेळीं कोणाला कल्पना येणार? हातांत घेतलेलें काम तडीस नेलें म्हणजे झालें. त्यांतून इतिहास आपोआप घडत जातो. इतिहास घडविण्यासाठीं कांहीं कोणी अशा गोष्टी मुद्दाम करीत नसतो आणि भावी इतिहास-कारांची अडचण भागविण्यासाठीं त्या घडणीचीं साधनें जपून ठेवीत नसतो! हीं साधनें जपून ठेविल्यानेंच कदाचित् त्या घटना सिद्धीस जाण्याच्या मार्गांत अडचणी उत्पन्न झाल्या असत्या, नव्हे तशीं अनेक उदाहरणें आहेत.

कै. गोविंदराव याळगी फारच अल्पायुषी झाले असें म्हटलें पाहिजे. त्यांची सारी हयात फक्त ३९ वर्षांची म्हणजे सन १८८५ पासून १९२३ पर्यंतची. त्यांचें शिक्षण जेमतेमच झालेलें होतें, त्यांचें वाचन फार नव्हतें, ते व्यासंगी नव्हते, लेखक नव्हते, आणि वक्ते तर नव्हतेच नव्हते. एखाद्या सभेत दोन वाक्यांचे आभार मानणेंहि त्यांना जमत नसे. सार्वजनिक कार्यें करणाऱ्यांना या सर्व गोष्टींची आवश्यकता आहे, असें मला वाटत नाहीं. इच्छा पाहिजे, कळकळ पाहिजे, अन्यायाची चीड पाहिजे, त्याग पाहिजे, धाडस पाहिजे. गोविंदरावांच्याजवळ हीं सर्व भरपूर प्रमाणांत होतीं. चार सहकारी एकत्र आले म्हणजे एकाची कमतरता दुसरा भरून काढतो. आपलें कमी पडेल तेथें गोविंदराव, गंगाधररावांचा उपयोग करून घेत आणि गोविंदरावांच्या हेतूविषयीं निःशंक असल्यामुळें गंगाधरराव आपला तसा उपयोग करूं देत. गोविंदरावांच्या गुणांची चांगली पारख त्यांना असल्यामुळें आणि त्यांच्या साहाय्याची ते किंमत ओळखून असल्यामुळें, गंगाधररावांना त्यांची भीड मोडवत नसे. आपल्या कृत्यांचे बरेवाईट परिणाम भोगण्याची दोघांची सारखीच तयारी असे. चुकलें तर कोणीं कोणाला कधीं दोष दिला नाहीं.

गोविंदराव आणि गंगाधरराव एकमेकांचे पूरक होते असें म्हणणें चूक होणार नाहीं. एक शस्त्री तर दुसरा शास्त्री अशी पुंडलिकजींनीं त्यांची पहिल्याच प्रकरणांत ओळख देऊन टाकली आहे. सभांच्या, उत्सवांच्या, दौऱ्यांच्या योजना गोविंदरावांनीं ठरवाव्या आणि त्या पार पाडण्याची कामगिरी गंगाधररावांवर सोंपवावी! उलट, गोविंदरावांचें हार्दिक सहकार्य गृहीत धरून गंगाधररावांनीं एक एक नवे व्याप शिरावर घ्यावे, असें काम चालत असे. आपली गुप्त व धाडसी योजना पार पाडतांना—विशेषतः जोखमीच्या राजकीय खटल्यांतील साक्षीदार पळवून नेतांना—गोविंदरावांनीं गंगाधररावांची आगाऊ संमति घेतांना, किंवा त्यांना त्यांचा सुगावा लागूं देतांना—कधींच दिसलें नाहीं. कार्यसिद्धि झाल्यावरच गंगाधररावांना त्या कळाव्या आणि त्यांनीं गोविंदरावांच्या हिकमती बुद्धीचें

कौतुक करावें! अशीं कृत्यें करतांना अगदीं आवश्यक तितक्याच लोकांना गोविंदराव विश्वासांत घेत आणि आपल्या योजनेंतील एकएक धागादोरा एकेकाच्या स्वाधीन करीत. असें करण्याबद्दल गोविंदरावांना पश्चात्ताप करण्याची एकदांहि पाळी आलेली नाहीं. यावरून माणसांची पारख करण्यांत त्यांचा किती हातखंडा होता तें ध्यानांत येईल. व्यूह रचतांना गंगाधररावांना दूर ठेविण्यांत गोविंदरावांचा हेतु एकच आणि तो म्हणजे आपल्या कृत्याची झळ गंगाधररावांसारख्या वंदनीय पुढाऱ्याला केव्हांहि लागूं नये! गोविंदराव आणि गंगाधरराव हीं एकाच शरिराचीं दोन अंगें होतीं. "गोविंदरावांच्यामुळें गंगाधरराव घडविले गेले कीं गंगाधररावांच्या सहवासांत सतत राहिल्यामुळें गोविंदरावांची मूर्ति निर्माण झाली हें ठरविणें तितकेंसें सोपें नाहीं. या दोघांचीं व्यक्तिजीवनें एकमेकांत इतकीं ओतप्रोत होऊन गेलेलीं होतीं कीं, सन १९०५ पासून तों सन १९२३ पर्यंत सार्वजनिक कार्यक्षेत्रांत एकाला सोडून दुसऱ्याला त्यांचें स्वतंत्र जीवनच उरलें नव्हतें असें म्हणावें लागेल. त्या काळांतील धडपडीमध्यें जी एक पिढी तयार झाली तिचा उपयोग गंगाधररावांनीं राष्ट्रसेवेंत करून घेतला. या पिढींतील उमदा तरुण म्हणजे गोविंदराव होत." (पान ३) असा या दोघांचा परस्पर संबंध पुंडलीकजींनीं प्रस्तुत पुस्तकांत सुंदर रीतीनें रेखाटला आहे.

खुद्द गंगाधररावांनीं आपल्या 'जीवनकथे'मध्यें गोविंदरावांचें स्वभावलेखन पुढील शब्दांत केलेलें आहे. "त्यांनीं बेळगांवांत केलेली सार्वजनिक कामगिरी अगदीं अमूल्य होती. त्यांचें शिक्षण फार झालेलें नव्हतें. तरी त्याचें अंतःकरण इतकें उदार आणि भावना इतक्या तीव्र होत्या कीं, शिक्षणाची उणीव त्यांच्या सार्वजनिक आयुष्यांत कधींच भासली नाहीं. सन १९०५-६ सालापासून त्यांच्या मरणापर्यंत म्हणजे सन १९२३ पर्यंत बेळगांवांतील सर्व सार्वजनिक चळवळीचे ते प्राण होते. माझ्या तर सर्व प्रवृत्ति त्यांच्यावरच अवलंबून असत. त्यांची मदत मला नसती तर माझ्या हातून जी अल्पस्वल्प देशसेवा घडली आहे ती घडली असती असें मला वाटत नाहीं. सार्वजनिक कामें करीत असतां किंवा माझ्या खाजगी संबंधांत माझ्यावर जे प्रसंग आले, त्या सर्व प्रसंगीं गोविंदरावांचें मला अत्यंत साहाय्य झालें आहे....याळगींचें घर म्हणजे बेळगांवांतील एक सार्वजनिक संस्था म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं." (पान ४)

खुद्द गंगाधररावांच्या मुखांतून पडलेल्या या शब्दांहून अधिक समर्पक रीतीनें गोविंदरावांचें वर्णन कोण करूं शकणार?

गंगाधरराव आणि गोविंदराव दोघेहि टिळकांच्या राजकारणांत वाढले. टिळकांनंतर गांधींचें राजकारण पहाण्यास किंवा प्रत्यक्ष करण्यास व त्यांत भाग घेण्यास गोविंदराव फार दिवस जगले नाहींत. गंगाधररावांनीं मात्र या दोन्ही राजकारणांचा दुवा आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धांत बेमालूम जोडून दाखविला. त्याची युक्तायुक्तता ठरविण्याचें हें स्थळ नव्हे. टिळकयुगानंतर गांधीयुग होऊन गेलें आणि आतां नेहरूयुगाचीहि समाप्ति झाली आहे. यापुढें कोणतें युग सुरू होणार त्याची कल्पना आतांच करतां येत नाहीं. पण नवें युग

कोणतेंहि उजाडलें तरी जुन्या युगांतील या घटना आणि त्या प्रत्यक्ष घडवून दाखविणाऱ्या व्यक्ति विसरतां येत नाहींत. गोविंदरावांचें कार्यक्षेत्र फार मोठें नव्हतें. बेळगांव शहर आणि जिल्हा त्याच्याबाहेर ते क्वचितच पडले असतील. पण या लहानशा क्षेत्रांत आपल्या कुवतीप्रमाणें त्यांनीं केलेले राजकीय उद्योग फार मोलाचे व महान् होते. या चरित्रग्रंथावरून हें ध्यानांत येईल कीं, कार्यक्षेत्र लहान घेऊनहि त्यांत मनुष्य किती मोठा होऊं शकतो याचें डोळ्यांत भरण्यासारखें उदाहरण म्हणजे गोविंदराव याळगी होत. त्या उद्योगांत स्वार्थाचा लवलेश नव्हता, सर्वस्वी देशाच्या भाग्याचा विचार होता, परराज्याची मनापासून चीड होती. गोविंदरावांसारख्या कितीतरी अज्ञात व्यक्ति आणि कितीतरी अज्ञात घटना आपल्या या भागांमध्यें होऊन गेलेल्या आहेत. त्या सर्वांचा परामर्ष नवीन पिढीला स्फूर्तिकारक आणि बोधदायक झाल्यावांचून राहाणार नाहीं. अग्रभागीं असलेल्या चारदोन पुढाऱ्यांचींच नांवें इतिहासामध्यें नमूद केलीं जातात. पण पाठीमागच्या शेकडों अज्ञात कार्यकर्त्यांच्या साहाय्यावांचून हे पुढारी कार्य करूं शकले नसते. लोक गंगाधररावांना पुढारी समजतात, पण ते स्वतःला गांधींचे आणि टिळकांचे अनुयायीच समजत. त्यांनीं सोडलेले आदेश प्रामाणिकपणें शेवटास नेणें, कार्यान्वित करणें एवढेंच कर्तव्य ते समजत. याळगींनीं आपल्या अनुयायित्वाचा बाणा केव्हांहि सोडलेला नाहीं. हरिकृपेनें ते आणखी जगले असते, तर देशकार्याला त्यांचा फार उपयोग झाला असता, यांत मला तिळमात्र शंका नाहीं.

श्री. पुंडलीकजींच्या सराईत लेखणीमुळें, ते व्यक्ति किंवा घटना यांचें लेखन फार परिणामकारक रीतीनें करूं शकतात. बहुतेक घटना त्यांनीं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेल्या आणि कांहीं घटनांमध्यें स्वतः प्रत्यक्ष भाग घेतलेला असल्यामुळें, एकंदर पुस्तक फारच मनोरंजक आणि उद्बोधक झालेलें आहे. पुंडलीकजींनीं त्यांच्या परिचयांत आलेल्या अशाच आणखी व्यक्ति आणि घटना उजेडांत आणाव्यात असें माझें त्यांना आग्रहाचें सांगणें आहे.


ता. १४-२-१९६५<br>
रविवार, मुंबई

**पां. म. बापट**

# विषयानुक्रमणिका


| नांव | पृष्ठ |
| --- | --- |
| लेखकाची मनोभावना ... ... ... | २ |
| नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं नमस्तुभ्यं ... ... | ५ |
| १. शास्त्री आणि शस्त्री .. ... ... | १ |
| २. याळगी कुटुंब ... ... ... | ७ |
| ३. याळगी भावंडें ... ... ... | १३ |
| ४. याळगी भावंडांतील बंधुप्रेम ... ... | १७ |
| ५. वडील निवर्तल्यानंतर ... ... ... | २० |
| ६. राजकारणांत प्रवेश ... ... ... | २३ |
| ७. गोविंदरावांची जन्मजात वृत्ति ... ... | २६ |
| ८. गोविंदरावांचा लोकसंग्रह ... ... ... | ३३ |
| ९. बेळगांवांतील हिंदुमुसलमानांचे दंगे ... ... | ३८ |
| १०. लोकमान्यांची चतुःसूत्री आणि गोविंदराव ... ... | ४१ |
| ११. लोकमान्यांचा दौरा ... ... ... | ५१ |
| १२. मद्यपाननिरोधन आणि वंदेमातरम् कैदी ... ... | ५६ |
| १३. सन १९०७ चें कॉंग्रेस अधिवेशन आणि गोविंदराव ... | ६३ |
| १४. राष्ट्रमत दैनिक ... ... ... | ६६ |
| १५. याळगीबंधूंचा मातृवियोग ... ... | ७१ |
| १६. क्रांतिकारकांची जडण-घडण ... ... | ७५ |
| १७. पंढरीच्या वाळवंटांतील शपथ ... ... | ७९ |
| १८. लोकमान्यांची बेळगांवांतील दुसरी फेरी ... ... | ८२ |
| १९. एक अग्निदिव्य ... ... ... | ८५ |
| २०. हणमंतराव देशपांडे यांच्यावरील बॉंबचा खटला ... | ९२ |
| २१. बेळगांवांतील एक अजब वल्ली ... ... | १०० |
| २२. नवा जोम आणि नवा व्यूह ... ... | १०६ |
| २३. नॅ. फि. अँड बॅं. कार्पोरेशन आणि गोविंदराव ... | ११४ |
| २४. खुनाच्या खटल्यांत गंगाधरराव ... ... | ११९ |

२५. बेळगांवची मुंबई इलाखा प्रांतिक परिषद ... ... १३२
२६. वेळगांवला लोकमान्यांची ओझरती भेट ... ... १४१
२७. एक फौजदारी खटला ... ... ... १४३
२८. तीन नवे सहकारी ... ... ... १४७
२९. इन्फ्ल्युएंझांतील जनसेवा... ... .. १५३
३०. गुरुराव मोकाशींच्या खुनाचे गुन्हेगार शोधून काढले ... १५६
३१. भारतीय मराठा परिषद, वेळगांव ... .. १५९
३२. महायुद्धानंतरची मंदीची लाट ... ... १६१
३३. (१) सन १९२० सालची जिल्हा परिषद ... . १६३
३३. (२) सोलापूरची मुंबई इलाखा राजकीय परिषद ... १६४
३४. लोकमान्यांचें महानिर्याण आणि गोविंदरावांची प्रतिज्ञा ... १६९
३५. कै. श्री. बळवंतराव नातू ... ... ... १७२
३६. लोकमान्यांनंतर गांधीजींचा भारतभर दौरा ... ... १७५
३७. गोविंदरावांच्या जीवनांतील विचारक्रांतीचें वर्ष ... १७९
३८. गंगाधररावांवरील असहकारी खटल्याची पार्श्वभूमि ... १८५
३९. सीमोल्लंघन गंगाधररावांचें पण योजना गोविंदरावांची ... १८८
४०. खटल्याच्या दिवसांतील कांहीं घटना . ... १९९
४१. आतां अधिक जोमानें काम चालू झालें .. .. २०५
४२. गोविंदराव याळगींचें अकालीं निधन ... .. २१४
परिशिष्ट पहिलें : कै. दे. भ. गोविंदरावांचें निधन .. २१७
'तरुणभारत' वेळगांवमधील अवतरण
,, दुसरें : नियतीचा तडाखा ... ... २१८
डॉ. ना. दा. सावरकर यांच्या लेखाचें अवतरण
,, तिसरें : लोकमान्य टिळकांचा जाहीरनामा ... २२२
,, चौथे : कै. बाबू अरविंद घोष यांचें राजकीय मृत्युपत्र २२५
,, पांचवें : कांहीं रहस्यमय क्रांतिकारक ... ... २३१
नांवांची सूचि ... ... ... ... २३६



पुंडलीकजी, गंगाधरराव, जीवनराव

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
ग्रंथ ............ नों. दि. ............



कै. दे. भ. गंगाधरराव देशपांडे